## हवामान

हवामान: स्थाननिहाय हवामानातील बदल, तापमान आणि पर्जन्यमान यांची सद्यस्थिती तसेच हवामानाचा अंदाज याबाबत अद्ययावत माहिती मिळते. या माहितीच्या आधारे शेतकरी लसूण पिकाच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर हवामानानुसार योग्य नियोजन करून पिकाचे संरक्षण करू शकतात.






## बाजार

स्थानिक व इतर बाजार समितीचे लसणाचे दैनंदिन बाजारभाव पाहता येतात त्यामुळे विविध बाजार समित्यांमधील बाजार भावांची तुलना करून तसेच बाजारभावाच्या आलेखाचा अभ्यास करून लसूण विकण्याची योग्य वेळ व बाजार भावाचा अंदाज करता येतो.



## पिक सल्ला

संचालनालयाकडून लसूण पिक व्यवस्थापनासाठी सोप्या भाषेत तसेच व्हिडिओच्या माध्यमातून पिक सल्ला दिला जातो. यामध्ये पेरणीपासून साठवणुकीपर्यंत प्रत्येक टप्प्याचा समावेश आहे.



## पीक दिनदर्शिका

पेरणीच्या तारखेच्या आधारावर शेतातील कामांचे सानुकूल वेळापत्रक दिले आहे, यामुळे प्रत्येक काम योग्य वेळी करता येते आणि उत्पादन वाढीस मदत होते.

## कांदा व लसूण संशोधन संचालनालयाच्या सेवा

हे ॲप तुम्हाला संचालनालयाच्या विभिन्न सेवांशी जोडते.
कृषी-व्यवसाय उद्भवन केंद्र कस्टम हायरिंग केंद्र
शेतकरी प्रशिक्षण










### गूगल प्ले स्टोअर वर लसूण पीक सल्लागार ॲप डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करा


www.dogr.res.in
dirdogr@gmail.com
@ICAR-DOGR
ICAR DOGR
icar_dogr
@ICARDOGR

भा.कृ.सं.प.-कांदा व लसूण संशोधन संचालनालय,
पुणे - ४१०५०५, महाराष्ट्र, भारत
dirdogr@gmail.com



विस्तार पत्रिका: ४६


# लसूण पीक सल्लागार

Garlic Crop Advisor

यशस्वी लसूण शेतीसाठी स्मार्ट निर्णय प्रणाली

### निर्णय सहाय्यक प्रणाली

- लसूण पोषण नियोजक
- लसूण डॉक्टर
- लसूण वाण मार्गदर्शक
  पीक दिनदर्शिका




डॉ. राजीव ब. काळे
डॉ. शैलेन्द्र गाडगे
श्री. शिवम गायकवाड
डॉ. विजय महाजन

भा.कृ.सं.प.-कांदा व लसूण संशोधन संचालनालय,
पुणे - ४१०५०५, महाराष्ट्र, भारत
dirdogr@gmail.com

# लसूण वाण मार्गदर्शक
## वाण निवड सहाय्य

लसूण लागवडीसाठी योग्य वाण निवडणे हे यशस्वी उत्पादनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. हे मार्गदर्शक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीच्या स्थानिक परिस्थितीनुसार सर्वात योग्य वाणाची निवड करण्यास मदत करते.

**स्मार्ट शिफारसी:** तुमच्या शेतासाठी सर्वाधिक योग्य लसूण जातींची शिफारस करते.

**माहितीआधारित निवडी:** स्थान, लागवडीचा हंगाम आणि कंदाचा रंग व पिकाचा कालावधी या माहितीच्या आधारावर योग्य वाणाचा सल्ला देते.

**परिणाम:** उच्च उत्पादन आणि अधिक चांगल्या बाजारभावासाठी उत्तम निर्णय घेण्यास मदत करते.








# लसूण पोषण नियोजक
## खत व्यवस्थापन सहाय्य

खत व्यवस्थापन हे भरघोस उत्पादन मिळवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. लसूण पोषण नियोजक शेतकऱ्यांना पिकाच्या गरजा आणि मातीच्या स्थितीनुसार योग्य पोषक तत्वांचे मापन करून सल्ला देते.

**वैज्ञानिक आधारावरील शिफारसी:** माती परीक्षणाच्या आधारावर लसूण पिकाच्या पोषक गरजांनुसार शिफारस करण्यात येते.

**संतुलित खताचे नियोजन:** खताचा स्रोत, हंगाम, वापरण्याची पद्धत आणि क्षेत्रफळ यावर आधारित योग्य खताचे प्रमाण निश्चित करते.

**अन्नद्रव्य कमतरता व्यवस्थापन:** अन्नद्रव्य कमतरतेची लक्षणे ओळखून योग्य उपाययोजना सुचवते.








# लसूण डॉक्टर:
## कीड व रोग व्यवस्थापन

कीड व रोग लसूण उत्पादनावर मोठा परिणाम करू शकतात. लसूण डॉक्टर शेतकऱ्यांना कीड व रोगांची लक्षणे ओळखण्यास मदत करते तसेच प्रभावी उपाययोजना सुचवते.

**सोपे निदान:** पिकातील लक्षणांची तुलना दिलेल्या चित्रांशी करून कीड व रोगांचे निदान करता येते.

**तज्ज्ञ सल्ला:** वैज्ञानिक आधारावर कीड व रोग नियंत्रण उपाय आणि योग्य रासायनिक शिफारसी मिळतात.

यामुळे शेतकऱ्यांना समस्या लवकर ओळखता येतात आणि त्यांच्या लसूण पिकाचे कीड व रोगापासून अधिक प्रभावीपणे संरक्षण करता येते.





